"राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना" यामध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. वृकमा ४३२१ (१५)/प्र.क्र.१४५/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ मार्च, २०२४

वाचा :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. वृकमा २०१२/ प्र.क्र.११७/ सां.का.४, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४.
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. पुरक ६९१९/ प्र.क्र.८३/सां.का.४, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९.
३) मा.मंत्रिमंडळाची दिनांक १६ मार्च, २०२४ रोजीची बैठक.

प्रस्तावना :-

"राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन" राज्य शासनामार्फत सन १९५४-५५ पासून राबविण्यात येते. या योजनेतील लाभार्थी हे संपूर्णपणे कला-साहित्य या क्षेत्राशी निगडीत असून त्यावर त्यांची उपजिविका अवलंबून आहेत. मान्यवर वृध्द साहित्यिक व कलाकार योजनेतंर्गत विभागाच्या उपर्निर्दिष्ट क्र. २ येथील शासन निर्णयान्वये कलावंतांच्या मानधनात दीडपट वाढ करण्यात आली होती. वयोवृध्द साहित्यिक व कलाकारांची संख्या विचारात घेता, सद्य:स्थितीत १०० इष्टांक आहे. मान्यवर वृध्द साहित्यिक व कलाकार मानधनात दीडपट वाढ करुन सुमारे ५ वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. सद्यस्थितीत मागील ५ वर्षांच्या कालावधीतील महागाईचा वाढता निर्देशांक पाहता तसेच, मा.लोकप्रतिनिधी, कलावंत तसेच विविध कलाकार संघटना यांचेकडून मान्यवर वृध्द साहित्यिक व कलाकार यांच्या मानधनात वाढ करण्याची शासनाकडे आग्रहाची मागणी होत आहे, ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे. साहित्यिक व कलाकार यांचे कार्य या दोन्ही क्षेत्रांसाठी समर्पित असल्याने अशा साहित्यिक/कलाकार यांना श्रेणीनिहाय तुलना करणे उचित नसल्याची मागणी सातत्याने केली जात होती. सरसकट एकच श्रेणी सर्व कलाकारांना लागू केल्यास वृध्द कलाकारांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन जीवनमान उंचाविण्यास मदत होईल अशी भावना व्यक्त केली जात होती. त्यांच्या पुढील पिढीस एक आत्मविश्वास निर्माण होऊन लुप्त होत चाललेल्या राज्याच्या काही सांस्कृतिक कलाकृती यांचे जतन व संवर्धन करण्यास मदत होईल. तसेच, या योजनेबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व नियमांमध्ये सुसुत्रीपणा आणणे आवश्यक असल्याने याप्रकरणी पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करून सर्वसमावेशक अशी एकच सुधारीत नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

दिनांक १६ मार्च,२०२४ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्य झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्यातील मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व प्रयोगात्मक कलांमध्ये पूर्णवेळ चरित्रार्थ अवलंबून असलेले कलाकार यांना मानधन मंजूर करण्याबाबत या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे सुधारित नियमावली मंजूर करण्यात येत आहे.

०२. योजनेचे नाव : "राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना"

०३. कलाकार व साहित्यिक :

कलाकार - जे कलाकार १५ वर्षांपेक्षा जास्त काळ प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात (performing art) सादरीकरण करणारे, केवळ संबंधित कलेवरच गुजराण असणारे कलाकार या योजनेसाठी पात्र असतील.

साहित्यिक– जे साहित्यिक १५ वर्षांपेक्षा जास्त काळ साहित्य क्षेत्रात लेखन करणारे केवळ त्यावरच गुजराण असणारे साहित्यिक. कलाक्षेत्राशी निगडीत लेखन / समीक्षा करता अशा साहित्यिकांचा या योजनेसाठी पात्र असतील.

०४. मानधन :

**कलावंतांना सरसकट एकच श्रेणी रुपये ५,०००/- इतके मानधन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.** सदर मानधन लाभार्थ्यांस तहहयात मिळेल. त्यासाठी पुन्हा प्रत्येक वर्षी नव्याने जिल्हास्तरीय समितीस कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. फक्त प्रतिवर्षी हयातीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

सदर मानधन लाभार्थ्यांना डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल. तसेच, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०२४ पासून करण्यात येईल.

०५. पात्रता :

१. ज्यांचे वय ५० पेक्षा जास्त आहे. दिव्यांगांना वयाची अट १० वर्षांने शिथिल करण्यात येत आहेत. (दिव्यांगांना वयोमर्यादा ४० वर्षे)

२. ज्यांचे कला व साहित्य क्षेत्रातील योगदान कमीत कमी १५ वर्षे आहे.

३. ज्यांनी साहित्य व कलाक्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व मोलाची भर घातली आहे.

४. वयाने ज्येष्ठ असणारे, विधवा/परितक्त्या/ दिव्यांग कलाकार यांना प्राधान्य राहील.

५. कलाकाराचे सर्व मार्गांनी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६०,०००/-पेक्षा जास्त नसावे.

६. ज्या कलाकारांची उपजीविका फक्त कलेवरच अवलंबून आहे असे कलाकार तसेच जे कलाकार फक्त कलेवरच अवलंबून होते, मात्र सध्या त्यांना इतर कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही असे कलाकार.

७. केंद्र किंवा राज्य शासनाच्या महामंडळे इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले पात्र कलाकार.

८. कलाकार/साहित्यिक महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

०६. निधी :

१. प्रत्येक जिल्हयासाठी तसेच संचालनालयास प्रतीवर्षी प्रत्येकी रुपये १.०० लक्ष एवढा निधी जिल्हास्तरीय समितीच्या कामकाजासाठी वितरीत करण्यात यावा. समितीचे सदस्य सचिव यांनी सदर निधी वापराचे नियोजन करुन आर्थिक वर्ष संपल्यावर एप्रिल मध्ये याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संचालनालयास सादर करावे.

२. निवड समितीचे अशासकीय सदस्यांसाठी अदा करावयाचे भत्ते वित्त विभागाच्या क्र. प्रवास १०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ३ मार्च, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात यावे. सदर भत्ते वर्षातून कमाल ४ बैठकांसाठी / जास्तीत जास्त ४ दिवसांसाठी लागू असतील.

०७. वारस व वारस प्रमाणपत्र :

१. लाभार्थी असलेला व्यक्ती यांच्या निधनानंतर मयत लाभार्थ्याचे पती/पत्नी हेच वारस असतील.

२. नव्याने नोंद झालेल्या कलाकार/साहित्यिक यांच्याकडून नामनिर्देशन व जोडीदाराचा एकत्र फोटो अर्जासोबत सादर करणे बंधनकारक असेल.

३. अस्तित्वात असणारे मानधन धारक कलाकार/साहित्यिक यांच्याकडूनही संबंधित यंत्रणेने नामनिर्देशन व जोडीदाराचा एकत्र फोटो घेणे बंधनकारक असेल.

४. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्याने उपलब्ध माहिती तंत्रज्ञान यंत्रणेद्वारे (ऑनलाईन) मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे माहिती सादर करेल.

०८. वारसदार मंजूर करणे :

१. सदर योजनेंतर्गत वारसाने सेतू सेवा केंद्राच्या माध्यमातून अथवा अन्य उपलब्ध माहिती तंत्रज्ञान यंत्रणेद्वारे (ऑनलाईन) मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे ६ महिन्यांच्या आत माहिती सादर करेल. वारसाकडून विहित मुदतीत मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास ज्या दिनांकास प्रस्ताव संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयास प्राप्त होईल त्या दिनांकापासून वारसास लाभ देय होईल.

२. सदर प्रस्तावावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेताखालील समितीने सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्वरीत निर्णय घेऊन सदर प्रस्ताव संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्याकडे पाठविणे बंधनकारक असेल.

३. जर पती व पत्नी दोघेही या योजनेचे लाभार्थी असतील, तर अशा प्रकरणात वारसांना सदरचे मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

०९. उत्पन्न मर्यादा :

लाभार्थ्यास कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची अट रुपये ६०,०००/- इतकी असेल.

१०. जिल्हास्तरावरील निवड समिती :

जिल्हाधिकारी स्तरावर निवड साठी समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

अ) जिल्हा स्तरावरील समिती ( मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून ) :

| | |
|---|---|
| मा. जिल्हाधिकारी, संबंधित जिल्हा | अध्यक्ष |
| मा.पालकमंत्री यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांपैकी जिल्ह्यातील ०९ मान्यवर कलाकार व ०१ सदस्य साहित्यिक असणे अनिवार्य आहे . | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| महानगरपालिका उपायुक्त ( महानगरपालिका क्षेत्र असल्यास ) | सदस्य |
| सहायक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई /छत्रपती संभाजीनगर/पुणे / नागपुर. | सदस्य |
| जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रामपंचायत ) | सदस्य सचिव |

ब) मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयांकरीता समिती :-

| | |
|---|---|
| मा. जिल्हाधिकारी, संबंधित जिल्हा | अध्यक्ष |
| मा.पालकमंत्री यांनी नामनिर्देशित केलेल्या जिल्ह्यातील सदस्यांपैकी ०९ मान्यवर कलाकार व ०१ सदस्य साहित्यिक असणे अनिवार्य आहे . | सदस्य |
| महानगरपालिका उपायुक्त, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | सदस्य |
| निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

क) समितीचा कार्यकाल :

अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचा कालावधी समिती स्थापित झाल्यापासून ३ वर्षाचा किंवा शासन आदेश होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत असेल. अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या रद्द झाल्यावरही, शासकीय सदस्य कार्यरत असल्याने समितीचे अस्तित्व कायम राहील.

११. लाभार्थी निवड वेळापत्रक :

लाभार्थी निवडीबाबत खालीलप्रमाणे वेळापत्रक असेल.

| क्र. | कालावधी | करावयाची कार्ये |
|---|---|---|
| १ | दरवर्षी जून महिन्यात | स्थानिक वर्तमानपत्रांमधून जाहिरात |
| २ | जुलै | अर्ज मागविणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | ऑगस्ट व सप्टेंबर | अर्जाची छाननी करणे तसेच त्रुटीच्या अर्जांना त्रुटीपूर्तता करण्यास संधी देणे. |
| ४ | ऑक्टोबर-नोव्हेंबर- | समितीच्या बैठका घेऊन लाभार्थी कलाकारांच्या नावाची निश्चिती करणे. |
| ५ | डिसेंबर | निवड समितीने इतिवृत्त संचालनालयात नावांच्या यादीसह या कार्यालयास कळविणे. |
| ६ | जानेवारी ते मार्च | संचालनालयाने पुढील आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात सदरील कलाकारांच्या मानधनाच्या निधीची तरतूद करणे. |
| ७ | पुढील आर्थिक वर्षाच्या माहे एप्रिल पासून | मानधन सुरु करणे. |

निवड समितीची बैठक दरवर्षी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे आयोजन करणे सदस्य सचिवांची जबाबदारी असेल, समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात यावे.

१२. कलाप्रकारांतर्गत लक्षांक :

निवड समितीने लाभार्थ्यांची निवड करताना खालील नमूद केलेल्या गटप्रकार निहाय एकूण इष्टांकांच्या टक्केवारीच्या मर्यादेत निवड करावी.

| गट | निवड करावयाची टक्केवारी |
|---|---|
| असंघटीत/संघटीत कला प्रकारातील लोककलावंत | ६०% |
| भक्ती संप्रदायाशी संबंधित कलाकार | १०% |
| चित्रपट व नाट्य क्षेत्रातील कलाकार | ३०% |
| लोप पावणाऱ्या कलाप्रकारांतील कलाकार, प्रयोगात्मक कलेतील इतर कलाकार | |
| साहित्यिक | |
| एकूण | १००% |

१३. <u>ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारणे :</u>

जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्जदारास अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक असेल. यासाठी लिंक नंतर पाठविण्यात येईल. तसेच, लाभार्थ्यास अदा करण्यात येणारे मानधन डीबीटीद्वारे अदा करण्यात येईल.

अर्जासोबत खालील कागपत्रांच्या समावेश असेल

| | |
|---|---|
| १. | वयाचा दाखल |
| २. | आधार कार्ड |
| ३. | उत्पन्नाचा दाखला |

| | |
|---|---|
| ४. | रहिवासी दाखला |
| ५. | प्रतिज्ञा पत्र |
| ६. | पति व पत्नीचा एकत्रित फोटो (लागू असल्यास) |
| ७. | बँक तपशील - बँक खाते क्रमांक व बँकेचा IFSC कोड क्रमांक. |
| ८. | अपंगत्व दाखला (लागू असल्यास) |
| ९. | राज्य/ केंद्र सरकारचे पुरस्कार प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १०. | नामांकित संस्था / व्यक्ती यांचे शिफारस पत्र (लागू असल्यास) |
| ११. | विविध पुरावे. |

१४. सदरचा खर्च लेखाशीर्ष (२२०५ १९०१) ५०-इतर खर्च या लेखाशीर्षातून भागविण्यात येईल. यासाठी नियंत्रक अधिकारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय तसेच, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून लेखाधिकारी घोषित करण्यात येत आहे.

१५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २३१/२०२४/व्यय-१५ (संगणक क्र. ६६१६५९) अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक ............................ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बाळासाहेब ईश्वर सावंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०. उप सचिव, (सां.का. ४) सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१३. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१४. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१६.सर्व जिल्ह्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर
१८. सर्व जिल्ह्यांचे कोषागारे अधिकारी
१९.सर्व जिल्ह्यांचे उप कोषागारे अधिकारी
२०.निवड नस्ती सां.का.४